# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक क्र. ८८/२०२०

**विषय :- कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्यालयातील उपस्थिती नियंत्रीत करण्याबाबत.**

शासनाने कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक/प्रशासकीय विभागामध्ये खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यासाठी सूचना करण्यात येत आहेत :-

१) यापूर्वीच विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागामधील अध्यापनाचे कामकाज शनिवार दिनांक १४ मार्च, २०२० पासुन पुढील आदेश मिळेपर्यंत बंद करण्यात आलेले आहे. शैक्षणिक विभागात कार्यरत सर्व अध्यापक व शिक्षकेतर सेवक यांनी घरी राहून कामकाज (Work From Home) करावे.

२) कार्यालयांतील तातडीच्या व महत्त्वाच्या कामकाजाकरीता सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील अत्यावश्यक अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयामध्ये उपस्थित राहण्याबाबत त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

३) सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील शक्यतो विद्यापीठ आवाराबाहेर राहणा-या अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजाकरीता विद्यापीठात बोलावू नये. शक्यतोवर त्यांना घरी राहून काम करण्याबाबत सूचना दयाव्यात.

४) या कालावधीत विद्यापीठ कार्यालयामध्ये उपस्थित नसणा-या सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी घरी बसून आवश्यकतेनुसार कामकाज पहावे व आवश्यकता भासल्यास त्यांना कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सूचना प्राप्त झाल्यास त्यांना त्यानुसार कार्यालयामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

५) सदर कालावधीत आरोग्य विषयक/इतर आपत्कालीन सेवा सुरु राहतील तसेच कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत स्थानिक प्रशासन/सार्वजनिक आरोग्य विभाग/आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशाचे पालन करणे अनिवार्य राहील. अत्यावश्यक सेवा पुरविणा-या संबंधित विभागाच्या विभागप्रमुख यांनी संबंधित सेवा सुरळित राहण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना त्यांच्या स्तरावर कराव्यात.

६) सदरचे निर्देश हे दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत लागू राहतील.

वरील सूचनांच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था यांनी त्यांच्या महाविद्यालय/परिसंस्थेकरिता योग्य निर्देश त्यांच्या स्तरावर निर्गमित करावेत.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ १५५९
दिनांक : २२/०३/२०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
३. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये
४. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

आपणास विनंती की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.